# Loksatta

## Force Motors

**Date: 21/03/2018 | Edition: Pune | Page: 10 | Source: Bureau | Clip size (cm): W: 6 H: 13**



# फोर्स मोटर्सची रोल्स रॉईसशी भागीदारीत संयुक्त कंपनी

### इंजिन निर्मिती प्रकल्पासाठी ३०० कोटी गुंतवणूक




रोल्स रोईस पॉवर सिस्टीम्सचे अँड्रस शेल व फोर्स मोटर्सचे प्रसन्न फिरोदिया यांनी मंगळवारी मुंबईत संयुक्त भागीदारीची घोषणा केली.

**व्यापार प्रतिनिधी, मुंबई**

**व्यापारी वाहनांच्या** निर्मितीतील भारताच्या अग्रेसर फोर्स मोटर्स समूहाने जर्मनीच्या रोल्स रॉईस पॉवर सिस्टीम्सबरोबर भागीदारी जाहीर केली असून याअंतर्गत विकसित करण्यात येणाऱ्या इंजिननिर्मितीकरिता ३०० कोटी रुपयांची गुंतवणूक करण्यात येणार आहे.

मुंबईत याबाबतची घोषणा रोल्स रोईस पॉवर सिस्टीम्सचे अध्यक्ष आणि मुख्य कार्यकारी अधिकारी अँड्रस शेल व फोर्स मोटर्सचे व्यवस्थापकीय संचालक प्रसन फिरोदिया यांनी मंगळवारी केली.

फोर्स मोटर्सच्या पुण्यानजीकच्या चाकण येथील प्रकल्पातून हे इंजिन तयार करण्यात येणार आहे. यासाठी या प्रकल्पात नवी यंत्रणा सुरू करण्यात येणार आहे. ५४५ ते १,०५० हॉर्स पॉवर क्षमतेचे १० आणि १२ सिलिंडर श्रेणीतील १,६०० इंजिननिर्मितीची सुरुवात २०१९ मध्ये करण्यात येणार आहे. या व्यतिरिक्त १,६०० जनरेटर यंत्रेही तयार करण्यात येणार आहेत. त्यांची नेपाळ, श्रीलंका येथे निर्यात होईल, असे या वेळी सांगण्यात आले.

या इंजिननिर्मितीकरिता स्थापन करण्यात आलेल्या फोर्स एमटीयू पॉवर सिस्टीम्स कंपनीत फोर्स मोर्टसचा सर्वाधिक, ५१ टक्के तर रोल्स रॉईस पॉवर सिस्टीम्सचा उर्वरित ४९ टक्के हिस्सा असेल. रोल्स रॉईस पॉवर सिस्टीम्समार्फत सध्या जर्मनीमध्ये डिझेल इंजिननिर्मिती केली जाते. तर भारतात तयार होणारे जनरेटर यंत्र फोर्स एमटीयू नावाने निर्यात केले जाईल, अशी माहिती या वेळी देण्यात आली.